विदर्भ विकास मंडळाच्या अभ्यास अहवालांकरिता निधी उपलब्ध करून देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन आदेश क्रमांक: विविमं २०१६/प्र.क्र.४१/का.१४१६,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०८ मे, २०१८

संदर्भ - १. विभागाचे समक्रमांकाचे दिनांक २३ डिसेंबर, २०१६ रोजीचे आदेश

२. अपर आयुक्त तथा सदस्य सचिव, विदर्भ विकास मंडळ, नागपूर यांचे पत्र क्र. विविमं/संत्रा अ.अ./संस-१/२०१८/१०६ दिनांक ०३ मे, २०१८

शासन आदेश:

मा. राज्यपाल यांनी वार्षिक योजना २०१६-१७ करिता दिलेल्या निदेशांनुसार विदर्भ विकास मंडळाने हाती घेतलेल्या निम्नलिखित अभ्यासांना संदर्भ क्र. १ येथील आदेशान्वये मान्यता प्रदान करून पहिला हप्ता ४०% (आगाऊ) विदर्भ विकास मंडळास वितरित करण्यात आला आहे. त्यापैकी निम्नलिखित अभ्यास अहवालाच्या माहिती संकलनाचे काम पूर्ण झाले असल्याने संदर्भ क्र. २ येथील पत्रान्वये सदर अभ्यासाकरिता दुसरा हप्ता वितरित करण्याची विनंती करण्यात आली आहे.

अभ्यास अहवाल विषय	**संस्था**	**अभ्यासाकरिता मंजूर निधी**	**निधी वितरित**	**वितरित करावयाचा निधी**
			पहिला हप्ता ४०% आगाऊ	**दुसरा हप्ता ४०% माहिती संकलनानंतर**
विदर्भातील लिंबूवर्गीय फळ उत्पादन व व्यवस्थापनातील समस्यांचा अभ्यास	केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्था, नागपूर	९,००,८८५/-	३,६०,०००/-	३,६०,०००/-
एकूण				**३,६०,०००/-**

२. उपरोक्त अभ्यासाकरिता माहिती संकलनानंतर देय असणारा दुसरा हप्ता (४०%) एकूण ₹. ३,६०,०००/- (₹ तीन लाख साठ हजार फक्त) इतकी रक्कम या शासन आदेशान्वये विदर्भ विकास मंडळास उपलब्ध करून देण्यात येत आहे.

३. याबाबत होणारा खर्च "मागणी क्रमांक ओ-१०, ४५१५- इतर ग्रामविकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च, (००) (०२) वैधानिक विकास मंडळांचा क्षेत्रांतर्गत विकास कार्यक्रम, ५३- मोठी बांधकामे (४५१५ ००३९) (कार्यक्रम)" या लेखाशीर्षाखाली, सन २०१८-१९ या वर्षातील अर्थसंकल्पित तरतूदीतून भागविण्यात यावा.

हा शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक **२०१८०५०८१६१३५६२८१६** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Vidya Hampayya
Date: 2018.05.08 16:44:41 +05'30'

(विद्या हम्पय्या)
शासनाचे उप सचिव

प्रति,

सदस्य सचिव, विदर्भ विकास मंडळ, नागपूर.

प्रत माहितीस्तव:

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. महालेखापाल (१ व २), लेखा परीक्षा, मुंबई / नागपूर.
३. महालेखापाल (१ व २), लेखा व अनुज्ञेयता, मुंबई / नागपूर.
४. निवासी लेखाधिकारी, मुंबई/ नागपूर
५. निवड नस्ती, का. १४१६, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.